सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/सामूको/विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-१/८० ठ. क्र. १६ दि. १९।८।१७ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-१/८०

मौजे बोरामणी व मौजे तांदुळवाडी जिल्हा सोलापूर येथे नवीन विमानतळ विकसित करण्याबाबत दि.२१ ऑगष्ट २०१३ रोजी शासन निर्णय पारित झाला असून त्या निर्णयाप्रमाणे सोलापूर शहरामध्ये तीन वर्षाचे कालावधीत विमानतळाचे काम पूर्ण व्हावे असा आदेश देण्यात आला असून त्याची अंमलबजावणी त्वरित करावी. यापुढील काळात सदरहू विमानतळाचे काम युध्दपातळीवर केले गेल्यास सोलापूर शहर जिल्हयासह आजुबाजुच्या ४-५ जिल्हामध्ये आरोग्य, पर्यटन, उद्योगधंदे यांना चालना मिळणार आहे. त्याच बरोबर या नवीन विमानतळाच्या निर्मिती नंतर सोलापूर शहरामध्ये औद्योगिक आणि कामगारांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, त्या समस्या दूर होण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. त्यादृष्टीकोनातून मौजे बोरामंणी येथील विमानतळाचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे संदर्भात सोलापूर शहरवासियांच्या भावना मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब महोदय यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी मा.महापौर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय शिष्ट मंडळ सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना.विजयकुमार देशमुख, सहकार मंत्री मा.ना.सुभाष देशमुख, माजी केंद्रीय मंत्री मा.सुशिलकुमार शिंदे यांचेसमवेत जिल्हयातील मा.खासदार शरदजी बनसोडे तसेच मा. खासदार विजयसिंह मोहिते पाटील, मा.आमदार प्रशांत परिचारक, मा.आमदार तानाजी सावंत तसेच सर्व आजी व माजी आमदार व नेतेमंडळीसह भेटण्यासंदर्भात मा.महाराष्ट्र शासनाला विनंती करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

Ghatole P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/सामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..६८...ठ. क्र..१५..
दि..१९/८/१५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.

६८

संपूर्ण भारतात सोलापूर हे एक असे शहर आहे, जिथे १९४७ च्या स्वातंत्र्य चळवळीत भारत स्वातंत्र्य होण्याच्या चार दिवस अगोदर स्वातंत्र्य उपभोगलेले शहर आहे. या स्वातंत्र्य चळवळीत अनेक नरविरांनी स्वतःची आहुती देऊन हुतात्मा झाले. त्यापैकीच एक सोलापूरातील हुतात्मा कुर्बान हुसेन हे एक होत. त्यांचे वारसदार हमीमोद्दीन ईस्माईल शेख यांना राहणेसाठी त्यांची स्वतःची जागा नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे. तेव्हा त्यांना ५००० स्वे.फूट (पाच हजार चौ.मि.) ची जागा राहणेसाठी बांधून मिळणेसाठी आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

...पासह आजुबाजुच्या ४-५ जिल्हामध्ये आरोग्य, ... सदरहू विमानतळाचे काम ... विमानतळाच्या निर्मिती ...

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मासुली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ६९ दि. १९।८।१७ ......रोजी ठेवता खालील मो. ठराव क्र. १८ बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



संपूर्ण भारतात सोलापूर हे एक असे शहर आहे, जिथे १९४७ च्या स्वातंत्र्य चळवळीत भारत स्वातंत्र्य होण्याच्या चार दिवस अगोदर स्वातंत्र्य उपभोगलेले शहर आहे. या स्वातंत्र्य चळवळीत अनेक नरविरांनी स्वतःची आहुती देऊन हुतात्मा झाले. त्यापैकीच एक सोलापूरातील हुतात्मा कुर्बान हुसेन हे एक होत. त्यांच्या कुटूंबातील त्यांची बहीण पै. मरीयबी शेख असून त्यांना त्यांच्या उपजिविकेसाठी व हुतात्म्यांच्या ऋणातून थोडीशी उतराई होणेसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने प्रतीमहा मानधन देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे त्यांना सुरुवातीच्या काळात मानधन दिले गेले. परंतू नंतरच्या अंदाजे २० वर्षापासूनचे मानधन देण्यात आले नाही. ते थकीत मानधन फरक अंदाजे र.रु. ७,२०,०००/- इतकी देय आहे. तरी हुतात्मा अ. रसूल कुर्बान हुसेन यांचे भगिनीचे २० वर्षापासूनचे थकीत असलेले मानधन त्यांचे वारसदार हकीमोद्दीन ईस्माईल शेख यांना देणेस आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

... आनुषंगानुच्या ८-९ निवलमध्ये आरोग्य, ... काम
... निर्मिती केंद्र

सोलापूर महानगरपालिकेच्या नियमित/सापत्नी/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ७०
दि. १९/८/१७ रोजी ठेवता सालोल प्रो. ठराव क्र. ९९
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपलिकेच्या हद्दीतील सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याच्या ७०
...निष्काळजीपणामुळे डेंगूच्या रुग्ण संख्येत वाढ होत असून, या आजारामुळे कु. विकास शंकर कनेवाले व कु.
...च्या विवेक इंगळे, या दोन शाळकरी मुलांचा डेंगूच्या आजाराने बळी गेलेला असून, त्यांची घरची परिस्थिती
...अत्यंत हलाखीची असून त्यांच्या पालकांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन
...ले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

... पूर शहर ... काळात सदरहू विमानतळाचे आदेश देण्यात
... जिल्हयासह आजुबाजुच्या ४-५ जिल्हामध्ये आरोग्य, काम

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ७१
दि. १९/८/१७ रोजी ठेवता खालील ठो. क्र. २०
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.

सोलापूर महानगरपलिकेच्या प्र.क्र.११ येथील ओपन स्पेस असलेली जागा सर्व्हे नं.१४७/१ अंदाजे ओपन स्पेसची जागा २० हजार फुट असून शासनाच्या नियमाप्रमाणे ओपन स्पेसच्या १० टक्केप्रमाणे २ हजार चौ.फुटाचे सार्वजनिक व्यायामशाळा बांधकाम करण्यासाठी आमदार निधी, क्रिडा खाते व इतर अनुदानातून व्यायाम शाळा बांधकाम करण्यासाठी जय हनुमान बहुउद्देशीय सामाजिक संस्था किसान नगर अक्कलकोट रोड, सोलापूर या संस्थेस देण्यात यावे जेणे करुन या भागातील तरुणांना व्यायामाचे व कुस्तीचे आवड निर्माण होईल. तरी सदर संस्थेस सर्व्हे नं. १४७/१ नॉर्थ सोलापूर येथील हनुमान मंदिर शेजारील २ हजार चौ.फु. जागा व्यायाम शाळेस देण्यास आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले. ७१

अधिक्षक, भूमी व मालमत्ता, नगरअभियंता, सहा. संचालक नगर रचना, क्रिडाधिकारी व मा. आयुक्त यांचे अभिप्रायासह प्रकरण फेर सादर करावे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ७२ ठ. क्र. २१
दि. १८/८/१८ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

७२

सोलापूर महानगरपलिकेच्या हद्दीतील मिळकतदारांना दरवर्षी कर आकारणीचे जे देयके अदा केले जाते. त्या आर्थिक वर्षाच्या जूलै अखेर जर मिळकतदाराने कर आकारणीचे देयके भरले नाही तर त्यानंतर त्या मिळकत करावर प्रत्येक महिन्यास २ टक्के दराने दंड (शास्ती) लावला जातो तो लावण्यात येवू नये. सोलापूर महानगरपालिकेचेवतीने ज्या भौतिक सुविधा दिले पाहिजे ते आपण देत नाहीत. मिळकतवर केलेले कर आकारणीचे देयके आपण ॲडव्हान्समध्ये घेत असतो व ते ॲडव्हान्स नाही दिल्यास मिळकतदारांवर २ टक्के शास्ती लावणे नियमबाह्य आहे. म्हणून सदरचे नियमबाह्य व अन्यायकारक शास्ती रद्द करण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

कर आकारणी व कर संकलन प्रमुख, विधान सल्लागार, मुख्यलेखापरिक्षक व मा. आयुक्त यांचे अभिप्रायासह प्रकरण फेर सादर करावे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~खास~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ७३ ठ. क्र. 22 दि. १९/८/१७ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

७३

मा. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२८/नवि-२० दिनांक १५-७-२०१७ नुसार राज्यातील महानगरपालिका सदस्यांचे मानधन दरमहा रुपये १०,०००/- इतके करण्यास मान्यता देण्यात आले असून, सदर शासन निर्णयाप्रमाणे म.न.पा. सदस्यांना दिनांक १५-७-२०१७ पासून द्यावयाच्या मानधन वाढीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा. महानगरपालिकेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २-८-२०१७ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणास मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ७५, दिनांक ११-८-१७ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(सही) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुलो/प्रथाव सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ७४ ठ. क्र. 23 दि. १९।८।१७ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वांसाठी घरे कृती आराखडयामध्ये रे-हौसिंग को-ऑपरेटिव फेडरेशनच्या ३०,००० लाभार्थींची यादी तपासून ती वैद्य करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सोलापूरातील ३०,००० घरांच्या गृहप्रकल्पातील ३०,००० लाभार्थींची यादी सोलापूर महानगरपालिकेमार्फत वैद्य करणेसाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन व चेअरमेन रे- नगर-हौसिंग को-ऑपरेटिव हौसिंग सोसायटी यांचे पत्र असून त्यामध्ये प्रामुख्याने सोलापूरातील झोपडपट्टयातील अथवा झोपडपट्ट्या बाहेरील रहिवाशी असतील तर मोठया प्रमाणात स्थलांतर होऊ शकतात. त्यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय तसेच शासन स्तरावर देखील निश्चीत होणे आवश्यक वाटते, त्यामुळे ही यादी सोलापूर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेचे सल्लागारकडून तपासणी करण्यासाठी कर आकारणी व संगणक विभाग यांना पत्र देणेस, मा. आयुक्त यांचे आदेशाप्रमाणे ALL INDIA INSTTITUTE OF LOCAL SELF GOVERNMENT यांचेकडून ३०,००० लाभार्थ्यांची पात्रता तपासून घेणेसाठी त्यांना त्याप्रमाणे वर्कऑर्डर देणेस, करारपत्र करुन घेणेस व पात्रता ठरवून मिळणेचे कामाचा सर्व्हे करण्याचा कामाचा खर्च रे- नगर-हौसिंग को-ऑपरेटिव हौसिंग सोसायटी यांचेकडून त्यांना देणेस व रे- नगर-हौसिंग को-ऑपरेटिव हौसिंग सोसायटी यांनी दिलेल्या ३०,००० लोकांची पात्रता तपासून घेणेसाठी प्रस्ताव तयार करुन अलहिदा सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारणकडे सादर करणेस्तव प्र. नगरअभियंता यांनी निवेदन सादर केले असता त्यावर मा.यांनी केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा Housing for all या महत्वाचे धोरणाचा भाग आहे. लाभार्थी तपासणी ही महापालिकेच्या एजन्सी कडून झाल्यासच त्यांना सवलती मिळणार आहेत. त्यामुळे मनपा सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मान्यता आहे. असे प्रस्तावात नमूद केल्याने प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक मान्यतेस्तव मा. प्र. आयुक्त यांचे दि. ९-८-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याप्रकरणी खालील अटीवर मान्यता देणेत येत आहे.

१) महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता भविष्यामध्ये त्याठिकाणी वसाहत निर्माण झाल्यानंतर म.न.पा.कडून कोणतेही मुलभूत सोयी सुविधा शहराच्या बाहेर देऊ शकत नाही. सबब सदरहू रे-हौसिंग को-ऑपरेटिव फेडरेशन यांचेकडून भविष्यात मुलभूत सोयी सुविधांची (रस्ते, पाणी, ड्रेनेज व दिवाबत्ती) इ.ची मागणी करणार नाही. अशा आशयाचे करारपत्र करुन घेऊनच शहरात सर्व्हे करुन, स्क्रुटीनीचे कामकाज करण्यास मान्यता देणेत येत आहे.

२) शहरातील जे लाभधारक या योजनेत समाविष्ठ झाले असतील त्यांची झोपडपट्टीतील जागा महानगरपालिकेस हस्तांतर करण्यात यावी. या अटीवरच स्क्रुटीनी करणेस मान्यता देणेत येत आहे.

३) सदरहू स्क्रुटीनीच्या केलेल्या कार्यवाही माहिती वेळोवेळी महानगरपालिकेचे मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मासिक/~~विशेष~~
एवं साधारण सभेपुढे विषय क्र.ज ...७५... ठ. क्र...२४...
दि...१२।८।१८...... रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या किडवाई चौक हा गजबजलेला व वाहतुकीने वर्दळ असलेला भाग आहे. याठिकाणी मे. कोर्ट, शाळा, महाविद्यालय व गवत बाजार आहे. सदर चौकामध्ये मोठया प्रमाणात रहदारी वाहतूक असलेमुळे लहान-सहान अपघात होत असतात. याचे कारण पाहता सदर ठिकाणी चौकात असलेले आयलॅन्ड हे रस्ता व्यापत असलेमुळे त्याची गोलाई कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहतूक व रहदारी सुरळीत होवून चांगल्या प्रकारे लोकांना ये-जा करणेस मदत होणार आहे. किडवाई चौकामध्ये आयलॅन्डची गोलाई कमी करुन तेथे रस्ता तयार करुन वाहतूकीस सुरळीत होण्याच्या दृष्टीने कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याबाबत मा. नगरअभियंता व मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज......७६......ठ. क्र......२५......
दि......२९/८/१५......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



संत बुरुड केतय्या हे इ.स. १३ व्या शतकातील महात्मा बसवेश्वर यांनी स्थापन केलेल्या कालीन अद्यसंसद म्हटल्या जाणा-या अनुभव मंटपाचे सदस्य होते. त्यांना मंटपामध्ये मानाचे स्थान होते. एक महान संत असे त्यांची प्रचीती होती. समाजातील जातीयता, अंधश्रध्दा, वर्णभेद, स्त्रियावरील अन्याय अत्याचार यांना जोरदारपणे विरोध केला व तसेच दिनदलित, श्रमिकांचे व तसेच मानवतावादी विचारांचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांनी लिहलेली लोकजागर वर आधारीत वचने, काव्य प्रसिध्द आहेत. ते सोलापूरला ग्रामदैवत श्री. सिध्देश्वरांच्या भेटला सदैव येत. सिध्देश्वरांच्या वचन साहित्यामध्ये शरण बुरुड केतय्यांचा उल्लेख आढळला आहे. त्यामुळे श्री. सिध्देश्वरांच्या व शरण साहित्यात सदैव राहिलेल्या अशा महान संताचे नांव आजच्या पिढीला कायम स्मरणामध्ये राहावे या हेतुने शहरातील लक्ष्मी मार्केट पोलीस चौकी लगतच्या व नुतन पासपोर्ट कार्यालयाच्या समोरींल मुख्य चौकास संत बुरुड केतय्या चौक असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

(स्वाक्षरी) F.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ७७ ठ. क्र. २६
दि. १९/८/१७ रोजी ठेवता आलेला सो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील चौकास व रस्त्यास नांवे देण्यासाठी यापूर्वी व आता अनेक ठराव झालेले असून, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक ठराव नामाभिदान समितीकडे पाठविण्यांत येतात. परंतू सध्या नामाभिदान समिती अस्तित्वात नसल्यामुळे अनेक विषय प्रलंबित आहेत. तरी नामाभिदान समिती गठीत करुन नव्याने नामाभिदान समिती सदस्य नियुक्ती करुन प्रलंबित विषयास मंजूरी देणेस आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीमध्ये खालील मा. सदस्य यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) मा. महापौर - कन्वेनर
२) मा. उपमहापौर
३) मा. अध्यक्ष, स्थायी समिती
४) मा. सभागृहनेते
५) मा. विरोधी पक्षनेते
६) मा. चेतन पंडीत नरोटे
७) मा. किसन लक्ष्मण जाधव
८) मा. आनंद बाबूराव चंदनशिवे
९) मा. नुतन प्रमोद गायकवाड
१०) मा. भारतसिंग विठ्ठलसिंग बडूरवाले
११) मा. शिवानंद सिद्रामप्पा पाटील
१२) मा. नागेश लिंगराज वल्याळ
१३) मा. नारायण दत्तात्रय बनसोडे
१४) मा. मिनाक्षी मारेप्पा कंपली

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या स्थायी/सामान्य/प्रशासन
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. प्र. ६८ ठ. क्र. २६
दि. १५/८/१७ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सालाबादप्रमाणे श्रावणी समाप्तीनिमित्त, शेळगी गणपती कामेश्वर समस्त भक्त मंडळातर्फे यंदाही (अक्कीपूजा) अक्षता पूजा आयोजित केले आहे. सोमवार दिनांक २१-८-२०१७ रोजी रात्रौ १२.०० नंतर, मूर्ती रुद्राभिषेक व अथर्वशिष्य दाम्पत्य पूजा होईल. तसेच मंगळवार दिनांक २२-८-२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता महाआरतीचा कार्यक्रम आहे. त्यानिमित्त जवळपास तीन ते चार हजार भक्तगणांना महाप्रसाद (जेवण) दिले जात असते. तरी सदर कार्यक्रमास सोलापूर महानगरपालिकेतर्फे भरीव आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/सामान्य/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ७९ ठ. क्र. २८
दि. २१/८/१७ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.

१०९

सोलापूर शहरातील श्री. मल्लिकार्जून मंदिर असून, ते अत्यंत पुरातन काळातील आहे. सदर दैवत हे अनेक समाजाचे कुलदैवत असून, या कुलदैवताचा नावाचा प्रसार अद्यापपर्यंत पाहिजे तसा झालेला नाही. त्यामुळे त्यांचे शेळगी येथील हायवे ब्रिजच्यावर शेळगी गावात येताना लोकांच्या स्वागतानिमित्त शेळगी ग्रामदैवत श्री. मल्लिकार्जून पावन नगरीत आपले हार्दिक स्वागत करीत आहे तसेच शेळगी गावातून सोलापूर गावठाण भागात येताना त्याच ब्रिजच्या विरुध्द दिशेस सोलापूरचे ग्रामदैवत श्री. सिध्दारामेश्वर महाराज यांचे पावन नगरीत आपले सहर्ष स्वागत करीत आहे. अशा प्रकारचे फलक वजा नांव लावणेस, येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner